International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 6 No. 18 March - April - 2025

# शासकीय प्राथमिक शाळामध्ये दिल्या जात असलेल्या सुविधाविषयी पालकांच्या मताचे अध्ययन

*प्रा. मजितखान अमीनखान पठाण*
*गुलाम नबी आझाद समाजकार्य महाविद्यालय, पुसद जि. यवतमाळ (महा.)*
*Corresponding Author – प्रा. मजितखान अमीनखान पठाण*
**DOI - 10.5281/zenodo.15250564**

मुलांना घडविण्यात प्राथमिक शिक्षण हे अतिशय महत्वाचे आहे. मुलांची जडण-घडण येथेच होते. हा पाया जेवढा मजबूत असेल ते समोर जाऊन चांगले विद्यार्थी व नागरिक घडवू शकतात. हे सगळे घडते शिकत असलेल्या सुविधा कशा दर्जाच्या आहे. त्याचा उपयोग किती टक्के घेण्यात येते. चांगल्या शाळा किंवा इमारती किती सुंदर दिसतात यावर अवलंबून नसतात. तर तुमच्या मुलांच्या शिक्षणावर आणि एकुण विकासावर देखील अवलंबून असतात. शाळेत तुम्हाला सर्वात आधी काय लक्षात येते? तुमच्यासाठी ती चांगली शाळा का बनते? तुमच्या मुलाला शाळेत प्रवेश देण्यापूर्वी तुम्ही शाळेच्या पायाभूत सुविधांकडे लक्ष दिले पाहिजे. जेव्हा आपण पायाभूत सुविधांकडे लक्ष द्या. म्हणून जेव्हा आपण पायाभूत सुविधांबद्दल बोलतो तेव्हा आपण वर्गखोल्या, क्याफेटेरिया, क्रीडांगणे, ग्रंथालये, शिक्षक, स्वच्छतागृह, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था ई. संदर्भ घेतो.

## शालेय पायाभूत सुविधांचे महत्व :

### १) सकारात्मक आणि रोमांचक शिक्षण वातावरण:

लहान मुलांना वर्गातील धड्यांमध्ये रस निर्माण करणे कठीण असू शकते. ते सकाळी शाळेत येतात. त्यामुळे त्यांना उदास आणि झोपाळू वाटण्याची शक्यता असते. चांगल्या प्रकारे डिझाईन केलेले प्रकाशाने भरलेले वर्ग तुमच्या मुलाला चांगले शिकण्यास सकारात्मक वाटण्यास मदत करते. हे ज्ञानाच्या एका वेगळ्या जगाचे दार उघडल्यासारखे आहे. जिथे त्यांना आरामदायी यांनी अन्वेषण करण्यास आणि शिकण्यास उत्सुकता वाटते. विद्यार्थ्यांना असे वाटू नये की, त्यांना जबरदस्तीने शाळेत पाठवले गेले आहे. त्यांना मुक्तपणे फिरता आले पाहिजे, हवेशीर वर्गखोली असणे आवश्यक आहे.

### २) आधुनिक शिक्षण पद्धतींना समर्थन :

वर्गात शिकवणे हे फक्त बोर्ड आणि खडूवर अवलंबून असायचे ते दिवस आता गेले. आजचे शिक्षण खडू आणि बोलण्यापलीकडे जाते. त्यात परस्पर संवादी शिक्षण सत्रे, डिजिटल संसाधने आणि प्रत्यक्ष शिक्षण उपक्रमांचा समावेश आहे. चांगल्या शालेय पायाभूत सुविधा या उपक्रमांसाठी आवश्यक साधने आणि जागा प्रदान करतात जसे की, संगणक प्रयोगशाळा, विज्ञान प्रयोगशाळा आणि गट कार्यासाठी क्षेत्रे हे मुलाला आकर्षण पद्धतीने शिकण्यास आवश्यक असलेल्या साधनांमध्ये पूर्ण प्रवेश देण्याबद्दल आहे. आधुनिक शिक्षण पद्धतीमुळे शिकणे खूप मजेदार बनविते. बहुतेक खाजगी शाळांमध्ये शालेय मनोरंजनाकरिता सर्वोत्तम शिक्षण साधने आहेत. हे प्रमाण नगण्य आहे. शासकीय शाळांमध्ये आधुनिक साधनांचा अभाव आहे. साधने असून शिक्षकांची शिकविण्याची इच्छा नाही.

**३) एकाग्रता आणि प्रेरणा :**

कंटाळवाणे आणि कंटाळवाणी मुलं कधीही शिकू शकणार नाही. मुलाला दोष देऊ नका वातावरण असे असले पाहिजे की, त्यांची एकाग्रता वाढेल आणि त्यांना शिकण्याची प्रेरणा मिळेल. मुले आरामदायी आणि आकर्षक वातावरणात चांगले शिकतात. जर वर्ग खोली खूप गरम, खूप थंड किंवा गोंधळलेली असेल तर ती विद्यार्थ्यांचे लक्ष विचलित करू शकते.

**४) सुरक्षिततेला प्रोत्साहन:**

शाळेतील मुलांची सुरक्षितता महत्त्वाची आहे. मुलांना अशा शाळेत जावे असे वाटत नाही जिथे त्यांना त्रास होत असेल, त्रास दिला जात असेल, सुरक्षित वाटत नसेल, तिथे मुलांना चिंता वाटते. त्यामुळे त्यांच्या मानसिक आरोग्य आणि शिक्षणावरील लक्ष विचलित होते. जर शाळेत सुरक्षितता आणि आरामदायक वातावरण आणि खेळण्याची उपकरणे असतील तर यामुळे मुलांना सुरक्षितता आणि प्रेरणा मिळते.

**५) शारीरिक व्यायाम :**

आजच्या मोबाईलच्या युगात शारीरिक व्यायाम अतिशय महत्त्वाचे आहे. शारीरिक शिक्षण हे मुलांच्या विकासाचा एक महत्त्वाचा भाग आहे. चांगल्या पायाभूत सुविधांमध्ये खेळ व इतर प्रकारच्या शारीरिक क्रिया कलापांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध असल्या पाहिजे. लहान मुलांसाठी मोठे खेळाचे मैदान असो किंवा मोठ्या विद्यार्थ्यांसाठी क्रीडांगणे आणि व्यायाम शाळा असो, योग्य प्रकारच्या सुविधा असणे मुलांना निरोगी आणि सक्रिय राहण्यास प्रोत्साहित करते.

**६) सामाजीकरणाला समर्थन :**

शाळा म्हणजे फक्त शैक्षणिक आणि शिकण्याच्या समीकरणाबद्दल नाही. ती एक अशी जागा आहे, जिथे मुले इतरांशी संवाद साधण्यास आणि सहकार्य करण्यास शिकतात. शाळेतील वातावरण एकमेकांशी संवाद साधण्यास आणि एकत्र प्रकल्पांवर काम करण्यास आणि कायमस्वरूपी मैत्री निर्माण करण्यास अनुमती देतात. चांगल्या पायाभूत सुविधांमुळे समुदाय आणि आपलेपणाची भावना निर्माण होते. जी भावनिक तसेच सामाजिक विकासासाठी आवश्यक आहे.

**संशोधन तर्क :**

लहान मुलांची संस्कार शाळा पाहिली ही कुटुंब आहे, तर दुसरी ही प्राथमिक शाळा आहे. या दोन्ही प्रकारच्या संस्कार शाळेचा परिणाम भविष्यात चांगले व वाईट नागरिक निर्माण होण्यामध्ये होत असतो. समाजामधुन तसेच प्रशासकीय स्तरावरून नेहमीच ओरड होत असते की, प्राथमिक शाळेत मुल्य शिक्षणाची आवश्यकता आहे. आजच्या मोबाईलच्या युगामध्ये बरीच लहान मुले मोबाईलच्या आहारी गेली आहे हे आपण पाहतो किंवा पेपरमध्ये वाचत असतो. सुदृढ शैक्षणिक वातावरणए पालकांची जबाबदारी, शैक्षणिक सुविधा, शिक्षकाचे योगदान इ. घटक बघितले तर आशावादी दिसत नाही. सगळीकडे आजच्या शिक्षण पध्दतीविषयी नैराश्य दिसत आहे.

अभ्यासाच्या दृष्टीने "शासकीय प्राथमिक शाळामध्ये दिल्या जात असलेल्या सुविधाविषयी पालकांच्या मताचे अध्ययन" हा वास्तविक परिस्थिती व साहित्य परिक्षणातुन व अवलोकनातून अनेक प्रश्न निर्माण झालेत. वरिल प्रकारच्या संशोधन प्रश्नांची उत्तरे शोधुन काढण्यासाठी प्रस्तुत विषय शास्त्रीय संशोधनाकरिता घेण्यात आला आहे. साधारणतः खालीलप्रमाणे प्रश्न निर्माण झाली.

* पालकवर्ग पाल्याकडे दुर्लक्ष करित आहे काय?
* विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञान योग्यप्रकारे मिळत आहे काय?
* शिक्षणाबाबत पालकवर्ग उदासिन आहे काय?
* शैक्षणिक सुविधांचा अभाव आहे काय?
* प्राथमिक शिक्षणानंतरच्या शिक्षणाचा अभाव आहे काय?
* खरच प्राथमिक शिक्षणाकरिता आर्थिक स्थिती जबाबदार आहे काय?

* शिक्षक योग्यप्रकारे भूमिकेला न्याय देत आहे काय?
* शिक्षणाचा स्तर पुढे उच्च शिक्षण स्पर्धेत टिकण्यायोग्य आहे काय?
* विद्यार्थ्याला प्राथमिक शाळेत नविन काही शिकायला मिळते किंवा नाही .
* शाळेबद्दल विद्यार्थ्यामध्ये ओढ आहे काय?
* अर्थार्जनाचे साधन म्हणून पालक पाल्यांना शिक्षणापासुन वंचित ठेवतात.

**साहित्य परिक्षण :**

शालेय शिक्षण अतिशय महत्वाचे आहे. कारण शालेय जिवनात जि मुल्य, संस्कार रूजविले जातात. ते चिरकाल टिकणारे असतात. भविष्यात जिवन जगतांना या मुल्यांचा, संस्कारांचा सामाजिक जिवन जगण्यात अतिशय उपयोग होत असतो. चांगली माणसे आयात करता येत नाही तर ती निर्माण करावी लागते. ती शालेय जिवनापासुनच निर्माण करावी लागते. शिक्षणावर शासन विविध प्रकारे योजनांची अंमलबजावणी करून प्राथमिक स्तर उंचावण्याचा प्रयत्न करित आहे. विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढविण्याकरिता आमीषेही दाखविण्यात आली. परंतु बरेच पालक उदासीन आहे. शिक्षक योग्यप्रकारे आपल्या भुमिकेला न्याय देतांना दिसत नाही. सुविधांचा अभाव आहे इ. वर आतापर्यंत बरेच संशोधन झाले, लिखाण झाले. त्यातीलच काही विचारवंतांचे संशोधकांचे निष्कर्ष पुढीलप्रमाणे.

**डी. सी. यादव (२०१८) :** यांच्यानुसार मुलांना शिक्षणाप्रती नियमित प्रेरित करित राहीले पाहिजे. त्यांच्यासोबत सौदार्याने वागले पाहिजे. त्यांना शिक्षणाप्रती अभिरूची जास्त प्रेरणा असते.

**अलयाफ लिण्डे एड मासन (२००७)** :यांच्या अध्ययनावरून ज्या शाळेत वातावरण चांगले असेल, शिक्षकांचा विद्यार्थी प्रती दृष्टीकोन चांगला असेल त्या शाळेत मुलांमध्ये शिक्षणाप्रती जास्त प्रेरणा असते.

**उठवाल राहुल (२०१७) :** यांच्या अध्ययनानुसार शिक्षकांची भुमिका मनोवैज्ञानिकाची असते. सोबतच पालकांची जबाबदारी महत्वाची असते. शिक्षक विद्यार्थ्यांना समजण्यात ज्या सिमेपर्यंत सफल होतात. त्याच वेळेस त्यांचे अध्यापन प्रभावी होते. विद्यार्थ्यांचा लाभ होता. समायोजनाचा प्रयत्न केला जातो.

**श्री जय (१९९०) :** यांच्या संशोधनानुसार ज्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधा उत्तम दर्जाच्या असतात. ते मुल नियमित शाळेत जातात. अभ्यासामध्ये आवड असते आणि ते उच्च शिक्षणापर्यंत पोहचतात.

**श्री. पी. के. (१९८२)** :यांच्या अभ्यासानुसार सरकारी शाळेला आर्थिक मदत असते. वेतन जास्त असते. तर गैरसरकारी शाळेत शासकीय कोणतीही मदत नसते. शिक्षकांना वेतन कमी असते. तरीही गैर सरकारी शाळेतील विद्यार्थी अधिक बुध्दीमान असतात.

**राष्ट्रीय शैक्षणिक अनुसंधान और प्रशिक्षण परिषद (२००३) :**

यांच्या "पुर्व प्राथमिक शिक्षा अभियान एक परिचय" या पुस्तकाच्या अभ्यासानुसार मुल कोणत्याही राष्ट्राचे महानतम संसाधन ठरू शकतात. त्यामुळे मुलांच्या राष्ट्र कार्यात संधी मिळणे आवश्यक आहे.

**संशोधनाचे महत्त्व :**

प्रस्तुत संशोधनामध्ये प्राथमिक शाळेत दिल्या जाणाऱ्या सुविधा बाबत समाधान जाणून घेऊन योग्य अशा उपायोजना सुचविण्यात येणार आहे. त्यामुळे आज शिक्षणावर अर्थसंकल्पात जो खर्च होत आहे, त्यामध्ये वाढ होईल. शासकीय प्राथमिक शाळेतील विद्यार्थी संख्या जी दिवसेंदिवस कमी होत आहे. त्या कारणांचा शोध घेऊन त्यावर उपाययोजना सुचविल्या जातील. या संशोधनामुळे प्राथमिक शाळेतील सुविधा आणि पालकांची समाधानता माहीत होईल.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

1. शाळेतील सुविधा विषयी पालकाची समाधानता अभ्यासणे.
2. शासनाकडून मूलभूत आवश्यक सुविधा शाळेला पुरवितात याचे अध्ययन करणे.

**उपकल्पना :**

1. शाळेतील सुविधेविषयी पालक समाधानी नाही
2. शासनाकडून मूलभूत सुविधा योग्य प्रकारे पुरविल्या जात नाही.

**संशोधनाची व्याप्ती :**

प्रस्तुत संशोधन हे पुसद शहरातील नगरपरिषद आणि जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील जे पालक आहे आणि शाळेतील सुविधा एवढेच मर्यादित आहे.

**पालकांची निवड :**

प्रस्तुत संशोधनात पालकाची निवड ही सोयीस्कर नमुना निवड पद्धतीने केली आहे. कारण प्रत्येक जिल्हा परिषद किंवा नगर परिषद शाळेत शिकणाऱ्या मुलांच्या पालकांचे पत्ते उपलब्ध असणे शक्य नाही. त्यामुळे काही मोजक्याच पालकांची निवड सोयीस्कर नमुना निवड पद्धतीने करून १०० पालकाची निवड करण्यात आली.

**तथ्य संकलन :**

संशोधनासाठी लागणारी माहिती संकलित करण्यासाठी मुलाखत अनुसूची, निरीक्षण, लेख, पेपर कात्रण याचा उपयोग करून संकलित करण्यात आली आहे.

**संशोधन आराखडा :**

प्रस्तुत संशोधन आराखडा वर्णनात्मक अंशतः निदानात्मक आहे. कारण यामध्ये पालकाकडून शाळेतील सुविधेविषयी आणि घरातील सुविधेविषयी वर्णन केले आहे. आवश्यक तिथे माहितीच्या आधारे अंशतः निदान लावले आहे.

**अध्ययनाचे महत्त्व :**

हा संशोधन पेपर शासनाकडून ज्या विद्यार्थ्यांना सुविधा दिल्या जातात. त्याविषयी मोजमाप करणारे आहे. यामध्ये ज्या सुविधा दिल्या जातात, त्याचा दर्जा, उपयुक्तता, शिक्षक म्हणून संशोधनाची उपयुक्तता शिक्षकाची विद्यार्थ्याप्रती असलेली आपुलकी याचे मोजमाप, सुविधांचा दुरुपयोग अजून सुधारणा याचे योग्य मूल्यमापन केले आहे, समोरील नियोजनाला दिशा मिळाली.

**निष्कर्ष :**

1. 70 टक्के पालकांचे मत आहे, शासकीय प्राथमिक शाळेचा दर्जा घसरलेला आहे.
2. 30 टक्के पालकांना वाटते, शाळेतील गळतीचे प्रमाण आहे.
3. 65 टक्के पालकांचे म्हणणे आहे, शिक्षक विद्यार्थ्यांप्रति उदासीन आहे.
4. 90 टक्के पालकांचे मत आहे, शाळेला क्रीडांगण आहे, परंतु योग्य उपयोग होत नाही.
5. 50 टक्के पालकांना वाटते, शैक्षणिक साहित्याची कमतरता आहे.
6. 60 टक्के शिक्षकांनी उच्च दर्जाचे प्रशिक्षण घेतलेले नाही.
7. 50 टक्के पालकांना वाटते शिक्षक अपुरे आहे.
8. 90 टक्के शाळेत पिण्याच्या पाण्याची उच्च दर्जाची व्यवस्था नाही.
9. 85 टक्के पालकांचे मत आहे, आधुनिक स्वच्छतागृह नाही स्वच्छतागृह सुमार दर्जाचे आहे.
10. सुविधेच्या अभावामुळे पालक खाजगी शाळेत आपल्या मुलांना शिकवितात त्याचे प्रमाण 40 टक्के आहे.

11. शिक्षक आणि पालक यांच्यामध्ये सुविधा बाबत चर्चा होत नाही, असे म्हणणारे 80 टक्के पालक आहे.
12. संगणक व्यवस्था नाही म्हणणारे 85 टक्के पालक आहे.
13. 12 टक्के पालक म्हणतात संगणक असून त्याचा उपयोग होत नाही.
14. अद्यावत ग्रंथालय व्यवस्था नाही, त्याचे प्रमाण 82 टक्के आहे.
15. दृकश्राव्य व्यवस्था नाही, त्याचे प्रमाण 82 टक्के आहे.
16. वर्गखोल्या या खाजगी शाळेसारख्या नाही, असे म्हणणारे 60 टक्के पालक आहे.
17. स्वतंत्र वाचनालयाची व्यवस्था नाही, म्हणणारे 100 टक्के पालक आहे.
18. 70 टक्के पालकांच्या घरी अभ्यासाकरिता पोषक वातावरण नाही.
19. संगणकाचा वापर कधीच विद्यार्थ्यांना करू दिला जात नाही, असे १०० टक्के पालक म्हणतात.
20. शिक्षक विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करीत नाही, म्हणणाऱ्या उत्तरदात्यांचे प्रमाण 60 टक्के आहे.
21. पाल्य शाळेत गेला नाही गैरहजर असल्यास, पालकासोबत संपर्क साधला जात नाही असे म्हणणारे पालक 90 टक्के आहे.
22. विद्यार्थी केंद्रबिंदू मानून पालक सभा घेतली जात नाही, म्हणणारे उत्तरदाते 96 टक्के आहे.
23. शाळेतील सुविधा बाबत शिक्षकासोबत चर्चा झाली, म्हणणारे उत्तरदाते केवळ १० टक्के आहे.
24. पूर्वीच्या शिक्षणापेक्षा आत्ताचा शैक्षणिक स्तर घसरलेला आहे, असे म्हणणारे उत्तरदाते 80 टक्के आहे .
25. शैक्षणिक सुविधा बाबत आपण अवगत प्रत्यक्ष शाळेत जाऊन 20 टक्के निरीक्षणातून 40 टक्के तर 40 टक्के पालक म्हणतात, पाल्यासोबत चर्चेच्या आधारावर उत्तरे प्राप्त झाली आहे.

**शिफारसी :**

1. शासकीय प्राथमिक शाळेचा दर्जा उंचावला पाहिजे.
2. शिक्षक आपल्या कर्तव्याप्रती जागरूक असायला पाहिजे.
3. क्रीडांगण अद्यावत करायला पाहिजे शाळेच्या कामकाजात विद्यार्थी व पालक यांना सहभागी करून घ्यायला पाहिजे.
4. पिण्याच्या पाण्याची व स्वच्छतागृहाची उत्तम व्यवस्था करावी त्याच्या संरक्षण व स्वच्छता गावकऱ्यावर असावी.
5. पालक सभा नियमित व्हाव्या सुविधे बाबत चर्चा व्हावी कृती आराखडा तयार करावा.
6. जास्तीत जास्त दृकश्राव्य साधनांचा उपयोग करावा.
7. पालकांनी घरातील वातावरण अभ्यास योग्य करावे.
8. शिक्षण क्षेत्रात शिक्षक पालक विद्यार्थी या तीनही घटकांनी आपली जबाबदारी प्रामाणिक आणि इमानदारीने निभवावी. शासनाने ही नियमित आवश्यक त्यावेळेस साहित्य आर्थिक मदत प्रोत्साहन व प्रेरणा देणे गरजेचे आहे. सोबतच योग्य प्रकारचे मूल्यमापन व्हावे तरी परिस्थिती समोर यावी जेणेकरून सुधारणीला संधी प्राप्त होतात.

**संदर्भ :**

1. www.Shodhaganga.org.com
2. एम. बी. बूथ, Fifty survey of education research ecological and environmental studies in education
3. मुळे, उमाटे. (1998) शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे, विद्या प्रकाशन : औरंगाबाद
4. पंडित, बी. वी. (2005) शिक्षणातील संशोधन, पुणे : नित्र्य नूतन प्रकाशन
5. कुलकर्णी, पी. के. (2013) मानवी हक्क आणि सामाजिक न्याय, पुणे : डायमंड प्रकाशन